| MHJN100002052026 | **निशाणी क्र.०१ खालील आदेश**<br>(पारीत दि. २०/०३/२०२६) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार मयत नामे **बंडू भागोजी मानकर** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, मयत **बंडू भागोजी मानकर** हे अर्जदार क्र. १ चे पती, अर्जदार क्र. २ ते ४ यांचे आजोबा होते व ते **दिनांक १२/०७/२००१** रोजी मौजे पांगरी गो., ता. मंठा, जि. जालना येथे मयत झाले आहेत. अर्जदार पुढे असे कथन करतात की, मयत **बंडू भागोजी मानकर** यांची मुले नामे मनोहर बंडू मानकर हे दि. ०३/०७/२००३ रोजी व जनार्धन बंडू मानकर हे दि. ०४/०४/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. २ व ३ हे मयत मनोहर बंडू मानकर यांची मुले आहेत व अर्जदार क्र. ४ हे जनार्धन बंडू मानकर यांचा अज्ञान मुलगा आहे. अर्जदारांनी पुढे कथन केले आहे की, मयत **बंडू भागोजी मानकर** यांना अर्जदारांव्यतिरिक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. तरी अर्जदार हेच मयत **बंडू भागोजी मानकर** यांचे कायदेशीर वारस आहेत. तरी अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता मयताच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी सदर अर्ज मंजुर होण्यास विनंती

केली आहे.

**३**. अर्जदारांतर्फे वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. स्दरचे जाहीर प्रगटन हे दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या दैनिक **'बदलता महाराष्ट्र'** आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

**४**. अर्जदार क्र. २ सौरभ मनोहर मानकर यांनी सदर अर्जाच्या पुष्ठयर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ९ वर दाखल केले व त्यांच्या सरतपासात त्यांनी अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. तसेच अर्जदार क्र. २ यांनी स्वतःच्या आधारकार्डची प्रमाणीत प्रत निशाणी क्र. १० वर दाखल केली आहे. अर्जदारांतर्फे कागदोपत्री पुराव्यामध्ये मयत **बंडू भागोजी मानकर** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत नि. क्र. ११ वर दाखल केली आहे. मयत मनोहर बंडूजी मानकर यांच्या मृत्युप्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत नि.क्र. १२ वर दाखल केली आहे. नि.क्र. १३ वर मयत जनार्धन बंडू मानकर यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. नि.क्र. १४ ते १६ वर अनुक्रमे अर्जदार क्र. १, २ व ४ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. नि.क्र. १७ वर दैनिक बदलता महाराष्ट्र मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन दाखल केले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदारांचा पुरावा व प्रस्तुत दस्तऐवज

विना उजर व आक्षेपविना राहिले आहे.

**५**. अर्जदारांनी पुरावा बंद केल्याबाबतची पुरशिस निशाणी क्र. १८ वर दाखल केली आहे. संपूर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता व वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता, अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे नातू असून अर्जदार क्र. १ ते ४ हेच मयत नामे **बंडू भागोजी मानकर** यांचे ऐकमेव वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करीता खालील आदेश.

## आ दे श

१) अर्ज **मंजुर** करण्यात आला.

२) अर्जदार क्र. १ **वस्तलाबाई भ्र. बंडूजी मानकर**, अर्जदार क्र. २ **सौरभ मनोहर मानकर,** अर्जदार क्र. ३ **वैभव मनोहर मानकर,** अर्जदार क्र. ४ **सुरज जनार्धन मानकर** हे सर्व मयत **बंडू भागोजी मानकर** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांन आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.03.20 16:08:50 +0530

दिनांक– २०/०३/२०२६.

**(श्रीमती एल. पी. धन्वे)**
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), मंठा

**<u>प्र मा ण प त्र</u>**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे– अक्षय ईश्वर देशपांडे

न्यायालयाचे नाव– दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर), मंठा

न्यायनिर्णयाची दिनांक – २०/०३/२०२६

स्वाक्षांकीत/–

लघुलेखक (नि.श्रे.)